मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 7 जानेवारी 2025 | पान- 1


# HMPVच्या व्हायरसची भारतात एन्ट्री!

## कर्नाटकमध्ये तीन महिने आणि आठ महिन्यांच्या बालकांना या विषाणूची लागण

**पिंपरी | प्रतिनिधी**

HMPV या व्हायरसचा भारतात पहिला रुग्ण आढळला आहे. एका आठ महिन्यांच्या बाळाला HMPV या व्हायरसची लागण झाली आहे. ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस असं या व्हायरसचं नाव आहे. आठ महिन्यांच्या बाळाला या व्हायरसचा संसर्ग झाला आहे. बंगळुरुतल्या रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

आत्तापर्यंत या व्हायरसचे रुग्ण चीनमध्ये आढळत होते. मात्र बंगळुरुतल्या आठ महिन्यांच्या बाळाला या व्हायरसने ग्रासलं आहे. या बाळाने कुठलाही प्रवास केलेला नाही. दरम्यान या घटनेबाबत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला माहिती देण्यात आली आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वीच अशा प्रकारच्या व्हायरसला तोंड देण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. तसंच चीनमध्ये गेल्या काही दिवसांपासून आढळणाऱ्या या व्हायरसबाबत चिंता व्यक्त झाल्यानंतर आरोग्य मंत्रालयाने बैठक बोलावली होती. दरम्यान आता भारतात आठ महिन्यांच्या बाळाच्या रुपाने HMPV व्हायरसचा पहिला रुग्ण आढळला आहे.



### मास्क लावण्याचं आवाहन

» लहान मुले आणि वृद्ध लोक, तसेच एखाद्या आजाराने ग्रस्त असलेले आणि कमकुवत रोगप्रतिकार शक्ती असलेले लोक 'एचएमपीव्ही'च्या संसर्गाच्या बाबतीत अधिक संवेदनशील असतात. विषणूचा वाढता प्रभाव पाहाता, अधिकाऱ्यांनी लोकांना मास्क घालण्याची शिफारस केली असून, काही नवे नियम जारी केले आहेत.

### ह्युमन मेटापन्यूमो व्हायरसची लक्षणे काय आहेत?

ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) सामान्य सर्दी आणि कोरोना व्हायरससारखी लक्षणे दर्शविते. त्यामध्ये खोकला, ताप व सर्दी यांसारख्या लक्षणांचा समावेश आहे. कोविड-१९ नंतर पाच वर्षांनंतर ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही)चा प्रादुर्भाव चीनच्या अनेक भागांमध्ये वाढत आहे, ज्यामुळे अधिकारी चिंतेत आहेत. परिणामी, अधिकारी लोकांना मास्क घालणे आणि वारंवार हात धुणे यांसारखी खबरदारी घेण्याचे आवाहन करीत आहेत.

# आकुर्डीत श्री खंडेरायाचा उत्सव सुरु

## यात्रेनिमित्ताने शहराच्या कानाकोपऱ्यातून अनेक भक्तांनी दर्शनासाठी रांगा लावल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

आकुर्डी गावचे ग्रामदैवत व असंख्य नागरिकांचे कुलदैवत असणारे श्री खंडेरायाच्या उत्सवाला रविवारी (ता.५) सुरूवात झाली. या यात्रेनिमित्ताने पिंपरी-चिंचवड शहराच्या कानाकोपऱ्यातून अनेक भक्तांनी दर्शनासाठी रांगा लावल्या. सकाळी महाआरतीनंतर दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली.

यात्रे निमित्ताने मंदिराच्या आवारात गोंधळी आणि वाघ्या मुरळीकडून पाचपावली करून घेण्यात आली. मंदिरांचा परिसर हा झेंडूच्या फुलांनी सजविण्यात आला आहे. त्यासोबत आकर्षक विद्युत रोषणाईने मंदिरातील सर्व परिसर उजळून गेला आहे. मंदिरातील आजूबाजूच्या परिसरात भेळ, पेढे, नाष्टा, लहान मुलांना मनोरंजनाचे खेळ उपलब्ध झाले आहेत. त्याने विविध व्यावसायिकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली असल्याचे दिसून आले. सोमवारी (ता.६) रोजी मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार असून वसंतदादा पाटील मराठी शाळेच्या मैदानावर भव्य इनामी कुस्त्यांचा जंगी आखाडा भरणार आहे. उत्सव समितीचे अध्यक्ष विठ्ठल काळभोर, उपाध्यक्ष विजय काळभोर, खजिनदार संजय कुटे, सचिव सुनील कुटे, सभासद गंगाराम काळभोर, गोपाळ कुटे, प्रकाश काळभोर, जालिंदर काळभोर, संजय पाटील, सोमनाथ काळभोर, विजय काळभोर, नितीन कदम, निलेश पांढारकर, तुळशीराम काळभोर, संतोष तरटे, गणेश पाटील, गणेश काळभोर, प्रवीण पांढारकर, विनय काळभोर आदी पदाधिकारी आणि समस्त आकुर्डी ग्रामस्थांनी कार्यक्रमांचे संयोजन केले आहे.



### ग्रामदैवत खंडोबा यात्रेचा उत्साह


» आकुर्डी गावचे ग्रामदैवत व असंख्य नागरिकांचे कुलदैवत श्री खंडेरायाचा उत्सवाला रविवार (ता. ५) पासून सुरूवात झाली. त्यानिमित्त मंदिरास बाहेरुन व आतून फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. सकाळपासूनच हजारो नागरिक दर्शन घेण्यासाठी गर्दी करत आहेत. अनेक नागरिकांनी देवाचे दर्शन झाल्यावर तळी भंडारा भरला. तर काहींनी मनोभावे देवास नैवेद्य दाखवला. काहींनी जागरण गोंधळ देखील घातला. मंदिराच्या बाहेर खेळणी, विविध वस्तू, प्रसादाचे स्टॉल लागल्याने या उत्सवास यात्रेचे भव्य स्वरूप प्राप्त झाले आहे.

# आरटीई प्रवेश नोंदणी 13 जानेवारीपासून

## साडेनऊ हजार शाळांची नोंदणी केली जाणार : एक लाखाहून अधिक जागा प्रवेशासाठी उपलब्ध

**पुणे | प्रतिनिधी**

पहिली ते आठवीसाठी इंग्रजी शाळांमध्ये मोफत शिक्षणाची कवाडे उघडणाऱ्या आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी शाळा नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, येत्या 13 जानेवारीपासून विद्यार्थ्यांना नोंदणीची संधी दिली जाणार आहे. यंदा जवळपास साडेनऊ हजार शाळांची नोंदणी केली जाणार असून, एक लाखाहून अधिक जागा प्रवेशासाठी उपलब्ध होणार असल्याची माहिती प्राथमिकशिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.




आर्थिक दुर्बल आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हक्क कायद्यानुसार पहिली ते आठवीसाठी इंग्रजी शाळांमध्ये मोफत शिक्षणाची विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध केली जाते. संबंधित विद्यार्थ्यांचे शुल्क सरकारमार्फत संबंधित शाळांना शुल्क प्रतिपूर्तीद्वारे देण्यात येते. यंदा प्रवेश प्रक्रियेसाठी 18 डिसेंबरला शाळा नोंदणीची प्रक्रिया सुरू झाली.

नोंदणीसाठी 31 डिसेंबरची मुदत देण्यात आली. परंतु अपेक्षित नोंदणी न झाल्यामुळे प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या वतीने 4 जानेवारीपर्यंत शाळा नोंदणीला मुदतवाढ देण्यात आली. सध्या आरटीई पोर्टलवर दिसून येत असलेल्या आकडेवारीनुसार 8 हजार 316 शाळांची नोंद झाली असून, 1 लाख 1 हजार 474 जागा उपलब्ध झाल्या आहेत.

### पुण्यात 14 हजारांवर जागा उपलब्ध

**» आरटीई प्रवेश प्रक्रियेत दरवर्षी सर्वाधिक जागा पुण्यात उपलब्ध असतात. यंदादेखील प्रवेशासाठी 758 शाळांची नोंदणी झाली असून, 14 हजार 274 जागा उपलब्ध झाल्या आहेत. पुण्यात साधारण 900 हून अधिक शाळांची नोंदणी होत असते. त्यामुळे पुण्यातदेखील पुढील दोन दिवसांमध्ये शाळा तसेच जागांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

परंतु सर्व्हरच्या तांत्रिक अडचणींमुळे शाळांची नोंदणी पोर्टलवर बाकी असून, येत्या दोन दिवसांमध्ये साडेनऊ हजार शाळांची नोंदणी पोर्टलवर दिसून येईल तसेच रिक्त जागांचीही वाढ होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

> शाळा नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात 13 जानेवारीपासून विद्यार्थी नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.यंदा साडेनऊ हजार शाळांची नोंदणी होणार असून,1 लाखाहून अधिक जागा प्रवेशासाठी उपलब्ध करण्यात येणार आहेत.
>
> **- शरद गोसावी, संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय.**

---

# ऑनलाइन शिधापत्रिकेचे संकेतस्थळ पंधरा दिवसांपासून बंद

## कामकाज ठप्प : शहरात शिधापत्रिकेच्या संबंधित 60 ते 65 प्रकरणे प्रलंबित

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिधापत्रिका काढण्यासाठी नागरिकांची होणारी परवड थांबविण्यासाठी अन्नधान्य पुरवठा विभागाने शिधापत्रिकेची प्रक्रिया ऑनलाइन केली आहे. मात्र मागील आठ दिवसांपासून शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (आरसीएमएस) चे संकेतस्थळ बंद आहे. त्यामुळे शहरात शिधापत्रिकेच्या संबंधित 60 ते 65 प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत.



नवीन शिधापत्रिका काढणे, नावे चढविणे,कमी करणे,विभक्त करणे अशा विविध कामासाठी नागरिकांना सेतू कार्यालयात येत असतात. काही वेळा दिलेल्या मुदतीत शिधापत्रिका धारकांना मिळत नाही. त्यामुळे नागरिकांची शिधापत्रिका मिळविण्यासाठी फरफट करावी लागते. तर काही वेळा दलालाकडून ही नागरिकांची आर्थिक लूट होत होती. असे प्रकार थांबविण्यासाठी यासाठी शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली ( आरसीएमएस) विकसित करण्यात आली आहे.

शिधापत्रिका काढणे, शिधापत्रिकेमधील नावांची दुरुस्ती करणे, शिधापत्रिकेतील पत्ता बदलणे आदी कामे ऑनलाइन स्वरूपात केली जात आहेत. मात्र मागील पंधरा दिवसांपासून शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीचे संकेतस्थळ बंदच आहे. त्यामुळे शिधापत्रिका धारकांची ऑनलाइन स्वरूपात होणारी कामे रखडली आहेत. संकेतस्थळ सुरू नसल्याने पुरवठा विभागाच्या कर्मचार्यांना ही कामकाज करताना अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत.

नागरिक सातत्याने शिधापत्रिकेच्या संदर्भात विचारणा करण्यासाठी येतात त्यांना ही काम न होताच रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. संकेतस्थळ बंद असल्याने

> संकेतस्थळ बंद असल्याने ऑनलाईन पध्दतीची कामे प्रलंबित आहेत. मात्र, विविध वैद्यकीय योजनांचा लाभ घेण्याकरिता आवशयक असलेले दाखले आम्ही नागरिकांना कार्यालयीन पातळीवर उपलब्ध करून दिले असल्याने, त्यांना वैद्यकीय योजनांचा लाभ घेताना कोणतीही अडचण आलेली नाही. तर बारा आकडी क्रमांक आवश्यक असलेली वैद्यकीय लाभाशी संबंधित पाच प्रकरणे प्रलंबित असून, संकेतस्थळ सुरु झाल्यानंतर ही प्रकरणे प्राधान्याने मार्गी लावली जातील.
>
> **- विजयकुमार श्रीरसागर, झोनल ऑफीसर निगडी विभाग.**

शहरातील शिधापत्रिकेच्या संदर्भात प्रकरणे प्रलंबित राहिली असल्याची माहिती पुरवठा विभागाने दिली आहे.

या संकेतस्थळाच्या संदर्भात वरिष्ठ स्तरावर तक्रार दिली आहे. शासनाने वरीष्ठ स्तरावरून यावर निर्णय घेऊन लवकरात लवकर संकेतस्थळ सुरू करावे अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे. आरसीएमएसचे संकेतस्थळ बंद आहे. त्यामुळे काम करताना अडचणी येत आहेत. नागरिकांची कामे प्रलंबित राहत असल्याने त्यांच्या ही तक्रारी वाढत आहेत.

ऑफलाईन होते चांगले होते. शिधापत्रिकांची कामे ऑनलाइन केली आहेत. मात्र त्याचे वरीष्ठ स्तरांवरून नियोजन नसल्याने सातत्याने संकेतस्थळ बंद तर कधी चालतच नाही त्यामुळे कामे होत नाही. ऑफलाईनच्या वेळी नावे चढवणे, उतरविणे अशी कामे पटकन होत होती. आता संकेतस्थळ अडचणीमुळे कामे होत नाहीत. त्यामुळे ऑफलाईन होतेच बरे होते अशी प्रतिक्रिया काही शिधापत्रिका धारकांनी दिली आहे.

# कचरामुक्त पिंपरी-चिंचवडसाठी पुढाकार

## आरोग्य विभागाने आठ क्षेत्रीय कार्यालयांतील 80 ठिकाणांची पाहणी करून तेथे लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील कचराकुंड्या हटविल्यानंतर नागरिक मोकळ्या जागेवर कचरा टाकत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने आठ क्षेत्रीय कार्यालयांतील ८० ठिकाणांची पाहणी करून तेथे लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. या भागातील घंटागाड्यांची वेळ बदलण्यात येणार असून, या ८० ठिकाणांचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. तसेच उघड्यावर कचरा टाकल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.




केंद्र सरकारच्या वतीने गेल्या काही वर्षांपासून देशभर स्वच्छ सर्वेक्षण राबविण्यात येत आहे. केंद्र सरकारचे एक पथक शहरातील झोपडपट्टी, मंडई, बाजारपेठ, लोकवस्ती, सार्वजनिक शौचालये, रस्ता आदी भागांची पाहणी करून दर वर्षी स्वच्छतेचे क्रमांक जाहीर करते. स्वच्छ सर्वेक्षणासाठी दर वर्षी केंद्राचे पथक फेब्रुवारी महिन्यात येते. त्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने स्वच्छतेसाठी आतापासून पुढाकार घेण्यास सुरुवात केली आहे.

शहरात महापालिकेची आठ क्षेत्रीय कार्यालये आहेत. या क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध मोकळ्या जागा, रस्त्याच्या कडेला नागरिक कचरा टाकत आहेत. कोणत्या भागात सर्वाधिक कचरा उघड्यावर टाकला जातो, याची आरोग्य विभागाने पाहणी केली आहे. उघड्यावर कचरा टाकणाऱ्या परिसरातील कारणे जाणून घेऊन घंटागाड्यांची संख्या वाढवून वेळही बदलण्यात येणार आहे. क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या दहा ठिकाणांची जबाबदारी दहा अधिकारी, कर्मचाऱ्यांकडे देण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित परिसर स्वच्छ राहण्यासाठी मदत होणार आहे. त्यानंतरही कोणी उघड्यावर कचरा टाकल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाईचा इशारा आरोग्य विभागाने दिला आहे.

### ...तर पेट्रोल पंपचालकांना नोटीस

» शहरातील विविध मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या कमी आहे. कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या नागरिक आणि महिलांची स्वच्छतागृहांअभावी मोठी अडचण होते. शहरातील प्रत्येक पेट्रोल पंपावर नागरिकांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था केली जाते. मात्र, अनेक पेट्रोल पंपावरील स्वच्छतागृहे बंद अथवा नादुरुस्त असतात. त्यामुळे आरोग्य विभागाच्या वतीने शहरातील सर्व पेट्रोप पंपचालकांना नागरिकांसाठी स्वच्छतागृहे सुरू ठेवण्याबाबत आवाहन करण्यात येणार आहे. यासाठी पंपचालकांना पत्रही देण्यात येणार आहे. एक महिन्यानंतर सर्व पेट्रोप पंपांवरील स्वच्छतागृहे स्वच्छ आणि वापरण्यायोग्य आहेत का, याची पाहणी केली जाणार आहे. स्वच्छतागृहे सुरू न ठेवणाऱ्या पंपचालकांना नोटीस बजावण्यात येणार आहेत. नागरिक मोकळ्या जागांवर कचरा टाकत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कचरामुक्त पिंपरी-चिंचवड शहर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आठ क्षेत्रीय कार्यालयांतील ८० ठिकाणे निश्चित केली असून, या ठिकाणांवर आरोग्य विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. या ठिकाणांचे सुशोभीकरण करण्यात येणार असल्याचे सहायक आयुक्त अजिंक्य येळे यांनी सांगितले.

# पालिका ठेकेदारांवर मेहरबान; तब्बल तीनवेळा मुदतवाढ

## रुग्णालयांना मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या रुबी एल केअर सर्व्हीसेस व बीव्हीजी इंडियाची मुदत संपुष्टात

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएम) सह अन्य हॉस्पीटलमध्ये पॅरामेडीकल स्टाफ आणि मदतनीस इतर मनुष्यबळ पुरवण्यासाठी दोन खाजगी ठेकेदार कंपन्या दोन वर्षासाठी नियुक्ती केल्या. परंतु, दोन्ही ठेकेदार कंपन्याची मुदत संपुष्टात आली आहे. त्यांची मुदत संपूनही तब्बल तीन वेळा त्या ठेकेदारांना मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यामुळे रुबी एल केअर सर्व्हिसेस व बीव्हीजी इंडिया ठेकेदारावर महापालिका मेहेरबान आहेत का? असा सवाल उपस्थित होत आहे.




पिंपरी-चिंचवड महापालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालय तसेच, इतर रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, इतर पॅरामेडिकल स्टाफ व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली होती.

त्यामध्ये बीव्हीजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड व रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या दोन ठेकेदारी एजन्सीची ८ सप्टेंबर २०२१ ला दोन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचा कालावधी ३० सप्टेंबर २०२३ ला संपला. त्यानंतर नवीन एजन्सी नियुक्तीसाठी विविध कारणे देत प्रशासनाने त्यांना मुदतवाढ दिली आहे.

पहिली मुदतवाढ १ ऑक्टोबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत होती. त्यानंतर १ ऑक्टोबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये दुसरी मुदतवाढ देण्यात आली. तर आता नवीन वर्षासाठी पुन्हा या एजन्सींना मुदतवाढ देण्यात आली आहे.

महापालिकेचे दवाखाने व रुग्णालयांमध्ये मनुष्यबळ पुरवण्यासाठी रुबी एल केअर सव्हिसेस व बीव्हीजी इंडिया या एजन्सींना १ जानेवारी २०२५ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. आतापर्यंत या दोन्ही संस्थांना यापूर्वी १५ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. तर पुन्हा त्यांना तीन महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

तीन महिन्यांसाठी नियुक्त मनुष्यबळाचे एकत्रित वेतन, किमान वेतन, सेवा शुल्क व इतर अनुषंगिक रक्कम अदा करण्यासाठी १९ कोटी ६६ लाख ६९ हजार ५६९ रुपये खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीमध्ये मान्यता दिली आहे.

> महापालिकेने राबवलेल्या निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्येच संबंधित एजन्सींना दोन वर्ष काम आणि त्यानंतर एक वर्ष वाढ देण्याची अट होती. त्यानंतर त्यांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. निवडणूक आचारसंहिता असल्याने मनुष्यबळ पुरवण्यासाठीच्या नवीन निविदा प्रक्रियेचे काम पूर्ण झाले नाही. येत्या एक ते दोन महिन्यांमध्ये नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन त्यामध्ये येणाऱ्या एजन्सींची नियुक्ती करण्यात येईल.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी**

# बारामतीच्या वैभवात भर घालणारी शिवसृष्टी उभारा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून शहरातील विविध विकासकामांची पाहणी

**पुणे | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास जगासमोर येईल याद्दष्टीने प्राचीन आणि आधुनिकतेचा संगम साधून बारामतीच्या वैभवात भर घालणारी भव्यदिव्य शिवसृष्टी उभारण्यात यावी, बारामती परिसरात सुरु असलेल्या विविध सार्वजनिक विकासकामांच्या पाहणीप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निर्देश दिले.



अजित पवार यांनी तालुका फळरोपवाटिका, शिवसृष्टी, जलतरण तलाव, कन्हेरी वनोद्यान येथे सुरूअसलेल्या सार्वजनिक विकासकामांची पाहणी करुन संबंधित अधिकांर्याकडून माहिती घेतली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपवनसंरक्षक महादेव मोहिते, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेटकर, उपविभागीय कृषी अधिकारी तुळशीराम चौधरी आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, शिवसृष्टीची कामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील, याबाबत दक्षता घ्यावी. शिवसृष्टीचे काम पूर्ण झाल्यावर नागरिकांना हेवा वाटेल, असे काम करावीत. परिसरात अधिकाधिक वृक्षाची लागवड करुन संपूर्ण परिसर हिरवेगार राहील, असे नियोजन करावे. कोणतीही कामे प्रलंबित राहणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी,याकरीता आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

तालुका फळरोपवाटिका कन्हेरी दुरुस्तीची किरकोळ कामे पूर्ण करुन घ्यावीत. संरक्षक भिंती आणि रस्ताच्या बाजूला वृक्षारोपण करावे. परिसरात शोभिवंत झाडे लावावीत. कुंड्यामध्येही वाढ करावी. आंबा, नारळ, सीताफळ येथील मातृवृक्षाची पाहणी करून त्याची व्यवस्थितपणे देखभाल करण्याच्या त्यांनी सूचना दिल्या.

> नव्याने उभारण्यात येणाऱ्या जलतरण तलावाची कामे करताना दर्जेदार, टिकाऊ फरश्या बसवाव्यात. भिंती, फरशांमधील फटी राहता कामा नये. महिलांच्या सुरक्षिततेचाही विचार करण्यात यावा. नागरिकांना चढ-उतर करण्यासाठी सोईस्कर पायऱ्या बसवाव्यात. विकासकामे करताना कॅनलच्या भिंतीला अडथळा निर्माण होणार नाही,याबाबत दक्षता घ्यावी.
>
> **- अजित पवार, उपमुख्यमंत्री**

कन्हेरी वनोद्यान परिसरातील विकास कामे करीत असताना कमी प्रमाणात पानगळ होणारी, सरळ वाढणारी, अधिकाधिक सावली देणाऱ्या स्थानिक प्रजातींचे वृक्षारोपण करा. वृक्षारोपण केल्यानंतर ती जगली पाहिजेत याकडे लक्ष द्यावे.

प्रवेशद्वाराला वनोद्यानाशी सुसंगत रंगरंगोटी करावी. लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेद्दष्टीने तसेच चढतांना-उतरतांना अडथळा निर्माण होणार नाही, अशा पायऱ्याची व बैठक व्यवस्था करावी. तलावात नौकाविहार सुरु करावे. तलावातील पाण्यासह परिसर स्वच्छ राहील, याची दक्षता घ्यावी. कामे झाल्यानंतर ती नैसर्गिक वाटली पाहिजेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी अनिल बागल, मुख्याधिकारी महेश रोकडे, वन परिक्षेत्र अधिकारी अश्विनी शिंदे,तालुका कृषी अधिकारी सुप्रिया बांदल, बारामती सहकारी बँकचे अध्यक्ष सचिन सातव आदी उपस्थित होते.

# वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्याचा अजब कारभार

## थकबाकी एकाची आणि मीटरसाठी वर्षभर हेलपाटे घालतोय दुसराच

**पुणे | प्रतिनिधी**

महावितरण कंपनीच्या भोर ग्रामीण कार्यालयात यशवंत मारुती धोंडे (रा. चिखलगाव ता भोर) यांनी घरगुती मीटरसाठी मागील वर्षी जानेवारी महिन्यात अर्ज केला होता. मात्र, थकबाकी असल्याचे कारण देत वर्षभर मीटर दिले नाही. संबंधित अधिकाऱ्याची बदली झाली, दुसऱ्या अधिकारयाला भेटल्यावर कागदपत्र सापडत नव्हती. शेवटी माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत बाठे यांनी कार्यालयात येऊन अधिकाऱ्यांना धारेवर धरल्यावर कागदपत्राची शोधाशोध केली. अखेर कागदपत्र सापडल आणि चलन भरून दोन दिवसात शेतकऱ्याला मीटर देण्याचे मान्य करण्यात आले.



यामुळे वर्षभराने बाठे यांच्यामुळे शेतकऱ्याला न्याय मिळाला आहे.

याबाबतची महिती अशी, मंदार राघू धोंडे यांची वीज बिल थकबाकी आहे. मात्र, मंदार धोंडे व यशवंत मारुती धोंडे यांच्या वडिलांचे नाव एकच असून खात्री न करता महावितरणचे शाखा अभियंता संदीप गादे यांनी थकबाकी असल्याचे कारण देत मिटर दिलेला नाही. मात्र, प्रत्यक्षात खात्री न करताच दुसऱ्या शेतकऱ्याची थकबाकी असताना केवळ वडिलांच्या नावात साम्य असल्यामुळे वर्षभर हेलपाटे मारूनही मीटर दिलेले नाही. याचा नाहक मानसिक त्रास संबंधित शेतकऱ्याला सहन करावा लागला.

शेवटी शेतकऱ्याने माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत बाठे यांना झालेला प्रकार सांगितला. त्यानंतर आज बाठे यांनी वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात संबंधित अधिकारी यांना धारेवर धरले. त्यानंतर कागदपत्रांची शोधाशोध झाली. कागदपत्रे सापडली, आणि चलन भरून सोमवारी मीटर देण्याचे मान्य केले. यामुळे संबंधित शेतकरी यशवंत धोंडे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

> वीज वितरण कंपनीची थकबाकी आहे, का नाही याची खात्री केली. मात्र, यशवंत धोडे यांची कोणतीही थकबाकी नाही. त्यामुळे त्यांना मीटर देण्यास कोणतीच अडचण नसून दोन दिवसात मीटर बसवला जाईल.
>
> **- पी. एन. गायकवाड, शाखा अभियंता, महावितरण.**

> ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना घरगुती मीटर महत्त्वाचा असून संबंधित अधिकारी यांनी शेतकऱ्यांना हेलपाटे मारायला लावू नये. शेतकऱ्यांना मदत करावी.
>
> **- चंद्रकांत बाठे, माजी जिल्हा परिषद सदस्य.**